# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

**महामंडळाचे ध्येय व धोरण :**

कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या वाटयास आलेले ५८५ अ.घ.फू. पाणी वापराच्या दृष्टीने विविध मोठे, मध्यम, लघु पाटबंधारे प्रकल्प व उपसा सिंचन योजनांची कामे पूर्ण करणे.

महामंडळाच्या स्थापने पूर्वी ३८५ अ.घ.फू.पाणी साठयाची कामे पूर्ण करण्यात आली होती व उर्वरित १७५ अ.घ.फू. पाणी साठा निर्मितीची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महामंडळा समोर होते. यापैकी जून २००७ पर्यंत महामंडळाने १२३ अ.घ.फू. पाणी साठा निर्मितीची कामे केली आहेत. सद्यःस्थितीत या महामंडळातंर्गत २० मोठे प्रकल्प, २० उपसा सिंचन योजना, ३३ मध्यम प्रकल्प व १४९ लघु पाटबंधारे प्रकल्पांची कामे बांधकामधीन आहेत. या व्यतिरिक्त १८३ ल.पा. प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली आहेत. तथापि या प्रकल्पांचे दायित्व शिल्लक आहे. बांधकामाधीन प्रकल्प महामंडळास प्राप्त होणा-या निधीतून पूर्ण करुन सिंचन निर्मिती करण्याचे महामंडळाचे धोरण आहे.